# शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद.
# GOVERNMENT POLYTECHNIC, AURANGABAD.
(AN AUTONOMOUS INSTITUTE OF GOVT. OF MAHARASHTRA)
OSMANPURA, AURANGABAD - 431 005.
Phone : (Office) (0240) 2334724, (A.O.) 2345936, (P) 2353644, Fax : 2353644


## ❊ संस्थेची माहिती व ठळक वैशिष्ट्ये ❊

शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद ही संस्था महाराष्ट्र शासनाची १९५५ पासून मराठवाड्यातील तंत्रशिक्षण क्षेत्रात नांव–लौकिक प्राप्त झालेली एक अग्रगण्य शासकीय संस्था आहे. त्यामुळे या संस्थेस महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये शैक्षणिक स्वायत्तता प्रदान केलेली आहे. संस्थेला सन १९१९–२० पासून ३ वर्षासाठी ५ कोर्सेसला **NBA** राष्ट्रीय मानांकन मिळाले आहे.

**(०१) संस्थेत उपलब्ध असलेले अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता :**

| Sr. No. | Course Name | Course Starting Year | Intake | Status of Accreditation |
|---|---|---|---|---|
| 01 | Automobile Engineering | 2008 | 30 | --- |
| 02 | Civil Engineering | 1956 | 120 | NBA Accredited |
| 03 | Computer Engineering | 2008 | 30 | --- |
| 04 | Dress Designing and Garment Manufacturing (Only for Female) | 1992 | 30 | NBA Accredited |
| 05 | Electrical Engineering | 1956 | 120 | NBA Accredited |
| 06 | Electronics and Telecommunication Engg. | 2001 | 120 | NBA Accredited |
| 07 | Information Technology | 2001 | 60 | --- |
| 08 | Mechanical Engineering | 1956 | 150 | NBA Accredited |
| 09 | Artificial Intelligence and Machine Learning | 2021 | 30 | --- |
| | | **Total** | **690** | |

**यासोबत TFWS स्कीम अंतर्गत ५% EWS १०% अतिरिक्त जागा उपलब्ध आहे.**
**❊ कोरोना काळात मृत्यु पावलेल्या पालकांच्या मुलांसाठी – २ जागा प्रति अभ्यासक्रमात उपलब्ध आहेत.**

**(०२) शैक्षणिक गुणवत्ता :**

- संस्थेत अभ्यासक्रमास आवश्यक असलेल्या सर्व प्रयोगशाळा अद्यावत यंत्रसामुग्रीने सुसज्ज आहेत.
- संस्थेत अनुभवी, जेष्ठ व उच्च शैक्षणिक अर्हता धारण केलेला शिक्षक वर्ग उपलब्ध आहे.
- संस्थेच्या शैक्षणिक स्वायत्तते अंतर्गत संस्थेतील विविध शाखांचा अभ्यासक्रम संस्थेतील जेष्ठ व अनुभवी प्राध्यापक वर्ग तसेच औद्योगिक उपक्रमातील उद्योजक व त्या क्षेत्रातील तज्ञ यांच्या समन्वयाने ठरविला जातो. यात अद्ययावत व औद्योगिक क्षेत्रात येवू घातलेल्या तंत्रज्ञानाची सांगड घातली जाते. त्यामुळे संस्थेतील विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मागणी आहे.
- उद्योग व अभ्यासक्रमाची सांगड घालण्यासाठी सर्व शाखेतील विद्यार्थ्यांच्या औद्योगिक उपक्रमास भेटी आयोजित केल्या जातात व औद्योगिक कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळण्याकरीता विद्यार्थ्यांना सहा आठवड्याच्या औद्योगिक प्रशिक्षणास पाठविले जाते.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्व विकास (Personality Development) व उद्योजकता विकास (Entrepreneurship Development) या करिता विविध प्रशिक्षण आयोजित केले जातात.
- महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे करण्यात आलेल्या Academic Monitoring मध्ये या संस्थेतील जवळजवळ सर्व अभ्यासक्रमांना उत्कृष्ट दर्जा प्राप्त झालेला आहे.

**(०३) जिमखाना :–**

- संस्था IDESSA च्या G1 Zone चे मुख्यालय म्हणून कार्यरत आहे. त्या अंतर्गत झोनमधील एकूण २६ तंत्रनिकेतन मधील मुलांच्या सर्व क्रीडाप्रकारात विभागीय सामन्यांचे आयोजन करण्यांत येते.
- संस्थेत २०१२ पासून G1 Zone चे मुलांचे व्हॉलीबॉल या क्रीडाप्रकाराचे विभागीय सामन्यांचे आयोजन करण्यांत येते, यात एकूण २१ तंत्रनिकेतने सहभाग घेतात.

- संस्थेत खो–खो, कबड्डी, बास्केटबॉल, हॉलीबॉल, क्रिकेट यासारख्या खेळांची मैदाने उपलब्ध आहेत.
- तांत्रिक शाखेचे विद्यार्थी असून सुध्दा विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून संस्थेचे स्नेहसंमेलन दर वर्षी मोठ्या उत्साहात साजरे करण्यांत येते. त्या अंतर्गत विद्यार्थी व विद्यार्थ्यीनी आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करतात. ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना मिळते.
- सर्व विद्यार्थ्यांना इतिहासातील थोर व्यक्तींचा आदर्श लाभावा याकरिता वर्षभर थोर व्यक्तींची जयंती व पुण्यतिथी साजऱ्या केल्या जातात. त्या अतंर्गत विद्यार्थ्यांकरीता तज्ञ व्याख्यांतांकडून मार्गदर्शन केले जाते.
- दरवर्षी ०१ जुलै रोजी जागतिक वृक्षारोपण दिन म्हणून साजरा करण्यांत येतो.
- दरवर्षी २१ जुन रोजी जागतिक योगा दिन उत्साहात साजरा करण्यांत येतो.
- दर वर्षी टिचर्स डे / इंजिनिअर्स डे मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.
- संस्थेतील ISTE व Institute of Engineers च्या Student Chapter अंतर्गत वर्षभर विविध क्षेत्रात अत्युच्च कामगीरी केलेल्या नामवंत व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात.

**(०४) ग्रंथालय**

शैक्षणिक संस्थेत ग्रंथालयास अनन्य साधारण महत्त्व आहे. ग्रंथालयाला शैक्षणिक संस्थेचे हृदय म्हणून संबोधले जाते. या संस्थेचे ग्रंथालय सर्व विभागांना सोयीचे होईल अशा स्वतंत्र व प्रशस्त इमारतीत प्रस्थापीत करण्यात आले आहे. उत्कृष्टतेची ओढ असणाऱ्या या संस्थेच्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी मानून ग्रंथालयीन सेवा सुविधा पुरविण्यात येतात. क्रमीक पुस्तकांशिवाय विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासांसाठी इतर अवांतर वाचनाची पुस्तके वाचकांना दिली जातात.

ग्रंथालयात वेगवेगल्या योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून आजतागायत एकूण ४७,३९७ पुस्तके उपलब्ध आहेत.
ग्रंथालयातील उपलब्ध सेवा सुविधा

- ☞ वाचन कक्षाची सुविधा उपलब्ध
- ☞ साप्ताहीक देवघेवीसाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना १ पुस्तक
- ☞ संदर्भ सेवा
- ☞ पुस्तक पेढी योजना
- ☞ नियतकालिकांची सुविधा आंतरग्रंथालयीन देवघेव सेवा.

**(०५) वसतिगृहे :**

संस्थेत बाहेरील मुला/मुलींची निवासाची व्यवस्था व्हावी, याकरीता

- मुलींसाठी १४२ प्रवेश क्षमता असलेले वसतिगृह उपलब्ध आहे. (यातील प्रथम वर्ष विद्यार्थ्यीनींकरीता ४० जागा आहेत)
- मुलांसाठी २०० प्रवेश क्षमता असलेले वसतिगृह उपलब्ध आहे. (यातील प्रथम वर्ष विद्यार्थ्यांकरीता जवळपास ६६ जागा आहेत)

**(०६) विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार**

संस्थेमध्ये सहकारी तत्त्वावर विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार उपलब्ध आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना माफक दरात शैक्षणिक साहित्य पुरविले जाते.

**(०७) संस्थेच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे संस्थेस खालील पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.**

- महाराष्ट्र शासनाचा Best Polytechnic Award – १९९६–९७
- ISTE नर्सी–मौंजी अवार्ड – २००६
- इंजिनिअरींग एज्युकेशन फाऊंडेशन, पुणे यांचा महाराष्ट्रामधील उत्कृष्ट तंत्रनिकेतन अवार्ड – २०१०

**(०८) प्रशिक्षण व आस्थापना विभाग (T.P.O.)**

- संस्थेमध्ये प्रशिक्षण व आस्थापना विभाग कार्यरत असुन, त्या अंतर्गत २०१८–१९ मध्ये १२३ व २०१९–२० मध्ये १३० व २०२०–२१ मध्ये १७९ व २०२१–२२ मध्ये २७१ विद्यार्थ्यांची औद्योगिक क्षेत्रात निवड झालेली आहे. जसे की **१) बजाज ऑटो लि. २) जीई इंडिया लिमिटेड ३) सुझुकी मोटर्स ४) फोर्स मोटर्स ५) नेक्चर ॲटोमोबाईल्स ६) सिग्मा टुल्स ७) व्हेरॉक ८) इंड्युरन्स ९) टाटा टेक्नॉलॉजी १०) टाटा मोटर्स ११) एल अँड टी १२) युरोलाईफ हेल्थकेअर १३) अमोर ब्युटी इंटरनॅशनल १४) ओम मायक्रोमॅटीक १५) थॉटवर्क १६) जॉनडिअर १७) अल्ट्राटेक सिमेंट १८) बीकेटी टायर्स १९) अदानी इलेक्ट्रीक २०) इन्फोसीस २१) जे.एस.डब्ल्यू. २२) फीलीप्स** या सारख्या नामांकित कंपनीत विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. अद्याप निवड प्रक्रिया चालु आहे.
- संस्थेतील जास्तीत जास्त विद्यार्थी इंजिनिअरींगच्या थेट द्वितीय वर्षात नामांकित कॉलेजमध्ये प्रवेश घेतात. जसे की 1) GECA, A'bad. 2) COEP, Pune. 3) PICT, Pune. 4) VIT, Etc.

याकरीता संस्थेला मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रीया पार पाडण्याकरीता Facilitation Centre (सुविधा केंद्र) E-FC and Physical FC प्रदान करण्यात आलेले आहे.

संस्थेत प्रवेश घेण्याकरीता सर्व विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षण विभागाच्या **www.dtemaharashtra.gov.in** या Website वरून अद्यावत माहिती प्राप्त करून घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी. (प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे.)

प्रवेशाकरीता काही अडचण असल्यास अथवा मार्गदर्शन/अधिक माहिती हवी असल्यास संस्थेत उपलब्ध असलेल्या प्रथम वर्ष मार्गदर्शन कक्ष ग्रंथालयातील तळ मजला येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा व संस्थेच्या **www.gpabad.ac.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी.

- प्रवेशाकरता लागणाऱ्या कागदपत्रांची यादी संस्थेच्या संकेतस्थलावर उपलब्ध आहेत.
- प्रवेशासाठीचे वेळोवेळी परिपत्रके बघण्यास्तव **https://poly22.gov.in** या संकेतस्थळावर पहावे.
- संस्थेमध्ये मोफत फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

✾✾✾